सयाजी ज्ञानमाला : ६

# महाराजा सयाजीराव आणि दामोदर सावळाराम यंदे

## राजश्री कदम




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

सयाजी ज्ञानमाला : ६

# महाराजा सयाजीराव
# आणि
# दामोदर सावळाराम यंदे

राजश्री कदम

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
दामोदर सावळाराम यंदे
इतिहास
राजश्री कदम
●
प्रकाशन क्रमांक - २६
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

सयाजी ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : राजश्री कदम
'दत्तकृपा निवास', गर्ल्स हायस्कूलसमोर,
नवे पारगाव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर - ४१६११३
मो. ८४२११२६५५४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २५ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# सयाजी ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी सयाजी ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही सयाजी ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**सयाजी ज्ञानमाला**
**ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# दामोदर सावळाराम यंदे

महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अफाट कार्यकर्तृत्वाचा शोध घेण्याची मोहीम म्हणजे एक प्रकारे ‘अमेझॉन जंगल सफारीचा’ थरारच आहे. भारतीय परिप्रेक्ष्यात विचार करता सयाजीरावांइतका बहुआयामी ‘लोकनायक’ दुसरा आढळत नाही. आपल्या ५८ वर्षांच्या कारकीर्दीत महाराजांनी करून ठेवलेले अफाट काम विचारात घेता शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेच्या अलौकिक कामाची आठवण होते. कारण शिवराय हे वंशपरंपरेने राजा झाले नव्हते. स्वकर्तृत्वाने राज्य निर्माण करून स्वत:ला स्वतंत्र राजा म्हणून त्यांनी प्रस्थापित केले. ही ऐतिहासिक कामगिरी करत असताना त्यांनी सर्व जाती-धर्माच्या कर्तबगार लोकांचा ‘एकजिनसी’ ऊर्जास्त्रोत विकसित केला. यामुळेच ते स्वराज्य संस्थापक होऊ शकले.

महाराजा सयाजीराव गायकवाड हेसुद्धा शिवरायांप्रमाणेच सामान्य परिस्थितीतून असामान्य कर्तृत्व गाजविण्यापर्यंत पोहोचू शकले. बडोद्याच्या राजघराण्याशी वांशिक नाते

असणाऱ्या कवळाण्याची पाटीलकी सांभाळणाऱ्या काशीनाथ गायकवाडांच्या पोटी त्यांनी जन्म घेतला. योगायोगाने ते बडोद्याचे राजा झाले. परंतु पुढे त्यांनी जो इतिहास निर्माण केला त्याला आधुनिक भारताच्या इतिहासात तोड नाही. राजपुत्र म्हणून जन्माला येऊन चांगला राजा होता येत नाही. तर चांगला राजा होण्यासाठी मानव कल्याणाचा ध्यास आणि कमालीची सर्वसमावेशकता असावी लागते. सयाजीरावांनी आपली कारकीर्द अतिशय देदीप्यमान केली यामध्ये कोणताही चमत्कार नव्हता तर प्रचंड ज्ञानसाधना आणि ज्ञानी व कर्तबगार गुणी लोकांचा समूह शासन प्रशासनात सहभागी करून घेण्याची दृष्टी हेच या यशाचे खरे गमक होते. महाराजांकडे सलग ३०-५० वर्षे काम केलेले कर्तबगार लोक होते. याचे कारण महाराजांची गुणग्राहकता होती.

दामोदर सावळाराम यंदे हे असेच एक कर्तबगार व्यक्तिमत्त्व होते. ते जवळजवळ ४५ वर्षे महाराजांच्या सहवासात होते. मराठीतील सर्वात मोठा प्रकाशक ही ओळख त्यांना महाराजांच्या राजाश्रयानेच मिळवून दिली होती. म्हणूनच यंदे म्हणतात, ‘मी साहित्य प्रकाशनाची दीक्षा सन १८९५ साली आपल्या बडोदे शहरातच आपल्या सहचारिणीसभेच्या व आपले विद्याभिलाषि श्रीमंत महाराज साहेब यांच्या सान्निध्यात घेतली आहे. गेल्या पन्नास वर्षात माझ्या हातून प्रकाशनक्षेत्रात जी काही अल्पशी सेवा झाली, तिचे सर्व श्रेय श्रीमंत महाराजांस व आपणासारख्या विद्वज्जनाकडे आहे.’

## अल्पपरिचय

दामोदर सावळाराम यंदे यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यात पारनेर तालुक्यात एका मराठा कुटुंबात १८६१ मध्ये झाला. मराठा जातीतील बहुधा ते पहिले प्रकाशक होते. संपादन, प्रकाशन, मुद्रण, लेखन अशा विविध भूमिका त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. सार्वजनिक जीवनात ते 'यंदे शेठ' म्हणून प्रसिद्ध होते. तर मित्रपरिवारात ते 'दादा' म्हणून ओळखले जात. त्यांचे आजोबा तुकारामबोवा आणि वडील सावळेरामबोवा हे वारकरी होते. त्यामुळे बालपणीच यंदे यांच्यावर भागवत, तुकाराम गाथा यांचे संस्कार झाले. आजोबांनी १८५७ च्या बंडानंतर ब्रिटिश लष्करातील नोकरीतून निवृत्ती घेतली आणि वडिलांनी ब्रिटिश लष्करातील नोकरी सोडली. त्यानंतर संपूर्ण कुटुंब अहमदनगर सोडून मुंबईला स्थलांतरित झाले. मुंबईत आल्यानंतर त्यांच्या वडिलांचा अकाली मृत्यू झाला. त्यामुळे कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. असे असले तरी इंग्रजीचे कामचलाऊ ज्ञान मिळण्याइतपत ते शिकले. त्यांच्यावर महात्मा फुल्यांचा वैचारिक प्रभाव होता. हा प्रभाव त्यांना सत्यशोधक म्हणण्याइतपत व्यापक होता. महात्मा फुल्यांची भाषणे ऐकून वर्तमानपत्राद्वारे समाजकार्य करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. त्यातून त्यांनी रघुनाथ कृष्णराव यांचा छापखाना घेऊन त्यांनी 'सृष्टिदर्पण' नावाचे साप्ताहिक सुरू केले.

१८९९ मध्ये यंदेंनी ‘इंदुप्रकाश’ पत्र आणि छापखाना यांचे पुनरुज्जीवन केले. लवकरच त्यांनी दामोदर गणेश पाध्ये आणि बलवंत रामकृष्ण मनेरीकर यांच्या सहभागाने ‘इंदुविजय’ कंपनीची स्थापना केली. पुढे ‘इंदुप्रकाश’ चे दैनिकात रूपांतर झाले. ‘टाइम्स ऑफ इंडिया’च्या एकतर्फी लिखाणाला शह देण्यासाठी फिरोझशहा मेहता यांच्या सल्ल्याने यंद्यांनी ‘धी इंदु ऑफ बॉम्बे’ हे इंग्रजी दैनिकही १९०८ मध्ये चालविले. पुढे लोटवाला-डांगे-जोगळेकर या साम्यवाद्यांकडे छापखाना आणि दोन वर्तमानपत्रे यांची मालकी सोपवून ते नाशिकला विश्रांतीसाठी गेले असता, व्यवस्थापनात बरीचशी उलथापालथ होऊन परिणामी ‘सयाजी विजय’ आणि ‘इंदुप्रकाश’ ही दोन्ही पत्रे यंद्यांना बंद करावी लागली. त्यापुढचा काळ त्यांनी मुद्रण व प्रकाशन व्यवसायात व्यतीत केला. दरम्यान ‘ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक मंडळी’चा मोठा व्याप त्यांनी निर्माण केला. महाभारताचा आणि श्रीभागवतपुराणाचा अनुवाद प्रसिद्ध करणे ही यंद्यांची महत्त्वाकांक्षा होती. आपल्या विद्वान मित्रांच्या सहकार्याने त्यांनी ती बरीचशी पूर्णही केली. चिंतामण वैद्यांचे मराठीमध्ये सार्थ महाभारत खंड १-८ यंद्यांनी १९३१-३७ पर्यंत प्रकाशित केले. भागवतपुराणाला जोडून भागवतामधील सुभाषितसंग्रह आणि भारतीय पौराणिक कोश यांचा खंडही त्यांनी प्रसिद्ध केला.

विठ्ठल रामजी शिंद्यांची व्याख्यानेही त्यांनीच छापली. श्रीमंत सयाजीराव, न्या. रानडे, लो. टिळक अशा थोर व्यक्तींचा विश्वास त्यांनी संपादन केला होता. टिळक राजद्रोहाच्या खटल्यात दोषी ठरून मंडाले येथे शिक्षा भोगण्यास गेलेले असता यंद्यांनी टिळकांचे कारकून अप्पाजी विष्णु कुलकर्णी यांनी लिहिलेले 'लो. टिळक यांची गेली आठ वर्षे' हे पुस्तक प्रसिद्ध केले.

## यंदेंना बडोद्याचे बोलावणे

महाराजा सयाजीराव गायकवाड हे अतिशय दूरदृष्टीचे आणि गुणग्राहक राज्यकर्ते होते. त्यांनी आपल्या कारकीर्दीत अनेक गुणवान लोकांना राजाश्रय दिला आणि त्यांच्याकडून जनहिताची मोठी कामे करून घेतली. दामोदर सावळाराम यंदे त्यापैकी एक. १८८१ मध्ये ज्या वर्षी सयाजीरावांना अधिकार प्राप्त झाले त्याच वर्षी रामजी संतुजी आवटे आणि दामोदर सावळाराम यंदे या दोन सत्यशोधकांनी मुंबई येथे 'शेतकऱ्यांचा कैवारी' या नावाचे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाचे यंदे संपादक होते. या पत्रात शेतकरी आणि मागासलेल्या जातींच्या सुधारणेसंदर्भात लेखन प्रकाशित होत होते. बडोद्याच्या राजवाड्याच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणून अनेक वर्ष काम केलेले वासुदेव बिर्जे हे सुद्धा 'शेतकऱ्यांचा कैवारी' मध्ये लिहीत असत. सयाजीरावांना आपल्या राज्यात एखादे दर्जेदार वृतपत्र असावे असे वाटत होते. १८८४ ला रामचंद्र धामणस्कर यांना मामा परमानंदांच्या शिफारशीवरून महाराजांनी बडोदा संस्थानच्या

प्रशासनात सरसुभे या पदावर नियुक्त केले. धामणस्करांच्या शिफारशीवरून महाराजांनी यंदे व आवटे यांना नवे वृतपत्र सुरू करण्यासाठी निश्चित केले. यानुसार सयाजीरावांचे खाजगी डॉक्टर असणारे डॉ. शिवाप्पा यांना यंदेंच्या भेटीला महाराजांनी मुंबईला पाठविले व बडोद्यास येऊन एखादे स्वतंत्र विचाराचे वर्तमानपत्र चालवावे हा महाराजांचा निरोप त्यांनी यंदेंना दिला. यंदे आणि आवटे तत्काळ बडोद्याला आले व त्यांनी मकरपुरा राजवाड्यात जाऊन महाराजांची भेट घेतली.

## सयाजीरावांचा दीर्घ सहवास

पुढे ५० वर्षे ते महाराजांबरोबर काम करत राहिले. ही फारच अविश्वसनीय बाब आहे. कारण महाराजांसारख्या शिस्तप्रिय आणि सतत भरपूर काम करणाऱ्या माणसाबरोबर इतकी वर्षे काम करणे ही सोपी बाब नाही. हे कसे शक्य झाले याचे रहस्य हे यंदेंच्या महाराजांशी झालेल्या पहिल्या भेटीच्या आठवणीतून समजून घेता येते. या संदर्भात यंदे म्हणतात, ‘पहिल्या भेटीतच महाराजांचे उदात्त विचार, लोकशिक्षणाची व समाज सुधारणेची कळकळ, सरळ, मधुर व प्रेमळ भाषण, शांत व आनंदी स्वभाव इत्यादी गोष्टीची छाप आम्हावर इतकी बसली की, श्रीमंताच्या इच्छेस आम्ही लगेच होकार दिला आणि सन १८८५ च्या आक्टोबर महिन्यात विजयादशमीच्या सुमुहूर्तावर ‘बडोदावत्सल’ या नावाने साप्ताहिकाचा जन्म झाला. या पत्रात येणारे लेख श्री. महाराज सर्व वाचत असत आणि त्यांत काही

सूचना किंवा लोकांचे गाऱ्हाणे आल्यास, त्या संबंधाने स्वत: चौकशी करून त्याची अंमलबजावणी करीत. त्यामुळे लोकांत व अधिकारी वर्गात एकप्रकारची जागृती उत्पन्न झाली आणि वर्तमानपत्राचे महत्त्व बडोदे राज्यात वाढले.' या संवादावरून महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक दुर्मिळ गुणांचे दर्शन घडते. महाराजांची दृष्टी काळाच्या फार पुढे होती हे जितके खरे तितकेच विविध क्षेत्रातील कर्तबगार गुणी लोक सांभाळण्याची कुवतही तितकीच महत्त्वाची होती.

## बडोदावत्सल आणि सयाजीविजय

आवटे आणि यंदे या दोघांनी 'बडोदावत्सल' हा छापखाना बडोदा येथे सुरू करून ११ ऑक्टोबर १८८५ ला 'बडोदावत्सल' हे साप्ताहिक सुरू केले. हे दर रविवारी प्रकाशित होई आणि मराठी, गुजराथी व हिंदी या तीन भाषेत यातील मजकूर येई. पुढे यंदे आणि आवटे यांचे मतभेद झाले. यंदे 'बडोदावत्सल' च्या कामातून वेगळे झाले आणि त्यांनी महाराजांच्या परवानगीने १८९२ मध्ये 'श्री सयाजीविजय' हे नवे साप्ताहिक ३१ नोव्हेंबर १८९३ रोजी सुरू केले. याचे संपादक दामोदर सावळाराम यंदे हेच होते. हे साप्ताहिकसुद्धा मराठी, इंग्रजी व गुजराथी भाषेत निघत होते. १८९६ नंतर ते गुजराथी व मराठी भाषेतूनच प्रसिद्ध होऊ लागले. या पत्राने चांगला लौकिक मिळवला. याचा खप दहा हजारपर्यंत गेला होता यावरून याच्या लोकप्रियतेची कल्पना येते. यासंदर्भात यंदे म्हणतात, '...या उत्कर्षाचे सर्व श्रेय श्री. महाराजांकडे आहे.

याचे कारण असे की, श्रीसयाजीविजयपत्रात येणारा मजकूर महाराज स्वत: वाचतात व त्यातील सूचनांची चौकशी लवकर होऊन लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लागते. ही परिस्थिती लोकांच्या लक्षात येतांच, लोकात वर्तमानपत्र वाचण्याची गोडी उत्पन्न झाली व पत्राच्या हजारो प्रती खपू लागल्या.' जागृतीकार भगवंतराव पाळेकर यांच्या जडणघडणीवर 'श्री सयाजीविजय' मधील लेखनाचा मोठा प्रभाव होता.

## ग्रंथ प्रसारक मंडळीची स्थापना

सयाजीविजय चालवीत असतानाच यंद्यांनी प्रकाशन व्यवसायात पाऊल टाकले. १८९५ मध्ये 'श्री सयाजीविजय' या साप्ताहिकाबरोबर यंदेंनी 'ग्रंथ प्रसारक मंडळी' या नावाने ग्रंथ प्रकाशन व्यवसाय सुरू केला. त्यामध्ये अल्पावधीत जमही बसवला. सयाजीराव महाराजांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या सहविचारिणी सभेने सिद्ध केलेल्या पुस्तकांचे प्रकाशन यंदे करू लागले. त्यात गो. स. सरदेसाई यांच्या मुसलमानी रियासतीचाही समावेश होता. दरम्यान स्वतः यंद्यांनी 'देवी वीरमती' नावाची ऐतिहासिक कादंबरी लिहिली. तिच्या मराठीत चार आवृत्त्या निघाल्याच व हिंदी आणि गुजराथी अनुवादही झाले. इतकेच नव्हे तर तिचे नेवाळकर यांनी संगीत नाटकात रूपांतर केले व बेळगावकर स्त्रीसंगीत मंडळीकडून त्याचे अनेक प्रयोगही झाले. सहविचारिणी सभेच्या विद्यमाने सुरू झालेल्या ग्रंथसंपादक मंडळीने जवळजवळ दीडशे ग्रंथांचे प्रकाशन केले.

यंदेंनी आपल्या कारकीर्दीत ७०० हून अधिक ग्रंथ प्रकाशित केले. त्यांच्या प्रकाशनाचे वैशिष्ट्य असे की मनोरंजनात्मक ग्रंथांपेक्षा माहितीप्रधान, वैचारिक, धर्म आणि तत्त्वज्ञान याबाबतच्या गंभीर ग्रंथांची संख्या यामध्ये सर्वाधिक आहे. मराठा जातीतील यंदे हे त्या काळातील सर्वात मोठे मराठी प्रकाशक होते. मराठीला वैचारिकदृष्ट्या समृद्ध करणारे अत्यंत मौलिक ग्रंथ यंदेंनी प्रकाशित केले. त्यामुळे मराठी साहित्य, समाज आणि संस्कृतीचे आधुनिकीकरण करण्यामध्ये ज्या प्रकाशकांचा वाटा आहे त्यामध्ये यंदे हे 'सूत्रधारा'च्या भूमिकेत आहेत हे महाराष्ट्रातील सध्याच्या प्रकाशकांनासुद्धा माहीत नाही. यंदेंमधील प्रकाशक 'सयाजीभूमी'त बहरला हा योगायोग नव्हता.

मातृभाषा आणि मातृभूमीशी असणारे 'जैविक' नाते इमानदारीने जपणाऱ्या एका महान राजाच्या दूरदृष्टीचा तो परिपाक होता. 'सयाजीरावांचे मराठी भाषा आणि साहित्याला योगदान' या विषयावर संशोधन झाल्यास महाराष्ट्राला चक्रावून सोडणारे निष्कर्ष हाती लागतील. असे संशोधन कुणी केले तर महाराष्ट्राचे 'बौद्धिक' आधुनिकीकरण करणारा सर्वात मोठा 'सर्जनस्रोत' सयाजीराव आहेत हा सिद्धांत प्रस्थापित होईल. यासंदर्भात १९३४ च्या बडोदा येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात प्रकाशन विभाग या सत्राच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना त्यांनी व्यक्त केलेली भावना या संदर्भात महत्त्वाची

आहे. ते म्हणतात, ‘यंदाच्या १९ व्या साहित्यसंमेलनातील पोटविभागापैकीं प्रकाशनकार्याच्या अध्यक्षाच्या जागी मजसारख्या वयोवृद्ध माणसाची निवड करून मजवर जी जबाबदारी आपण टाकली आहे, त्यात आपला काही विशिष्ट हेतू असावा असे मला वाटते. तो हेतू म्हणजे मी आपला आहे, आणि माझ्या हातून जे अल्पस्वल्प प्रकाशनकार्य गेल्या ४० वर्षांत झाले, त्याचा उगम येथेच आहे व आपल्याच परमपूज्य महाराजांच्या कृपाछत्राखाली आणि आपल्याच सान्निध्यात झाला आहे.’

## ग्रंथ संपादक मंडळीचा पहिला वार्षिक समारंभ

१८९८ मध्ये सयाजीरावांच्या अध्यक्षतेखाली लक्ष्मीविलास पॅलेसमध्ये ग्रंथ संपादक मंडळीचा पहिला वार्षिक समारंभ साजरा झाला. त्याच्या दुसऱ्या दिवशी महाराजांनी यंदेंना राजमहालात बोलावले. ठरल्याप्रमाणे राजमहालात गेल्यावर हुजऱ्याने त्यांना वरच्या मजल्यावर महाराजांच्या वाचनालयात नेले. तेथे परदेशातून येताना महाराजांनी आणलेली पुस्तके क्रमवार ठेवलेली होती. महाराज पुस्तके चाळत होते. या संदर्भात हा प्रसंग यंदेंच्याच शब्दात समजून घेणे उद्बोधक ठरेल. “मला पाहताच महाराज म्हणाले, ‘या मि. यंदे, येथें माझ्याजवळ कोचावर बसा.’ श्री. महाराजाशेजारी त्यांच्या कोचावर बसणे मला प्रशस्त वाटेना. मी म्हणालो, ‘महाराज, आपल्या शेजारी बसणे मला योग्य नाही. आपली काय आज्ञा आहे ती कळवावी.’

त्यावर महाराज म्हणाले, 'मी राजा आहे असे मानूं नका. मी एक मित्र आहे असे समजा व येथे बसा. आपल्याबरोबर मला पुष्कळ बोलवयाचे आहे.' महाराजांचा आग्रह दिसल्यामुळे निरुपाय होऊन मी कोचावर बसलो.

महाराज म्हणाले, 'तुम्ही चालविलेले ग्रंथप्रकाशनाचे काम फार चांगले आहे. सोप्या भाषेत लिहिलेल्या शास्त्रीय व इतिहास विषयावर मराठी भाषेत ग्रंथांची फार जरूर आहे.' समोर ठेवलेल्या अनेक पुस्तकांच्या संग्रहाकडे बोट करून महाराज पुढे म्हणाले, 'ही पाहा, कशी महत्त्वाची पुस्तके इंग्रजीत रोज नवी नवी प्रसिद्ध होत आहेत. अशी पुस्तके मराठीत सोप्या भाषेत प्रसिद्ध झाली पाहिजेत, की जेणेकरून बहुजनसमाजास सुलभतेने शास्त्रीय विषयाचे ज्ञान होईल." हे संभाषण विस्ताराने देण्यामागची भूमिका अशी आहे की एक राजा आपल्या प्रजेलाच नव्हे मराठी भाषिकांना जगाच्या ज्ञान स्पर्धेत अव्वलस्थानी नेण्यासाठी किती दक्ष होता. शास्त्रीय विषयावरील आणि इतिहासावरील पुस्तकांबाबतचा त्यांचा आग्रह फार महत्त्वाचा होता. समाज वैज्ञानिक दृष्टीने विचार करणारा व्हावा हे शास्त्रीय पुस्तकांचा आग्रह अधोरेखित करते तर इतिहास आपण कुठे चुकलो हे समजून घेण्यासाठी अभ्यासायचा असतो या भूमिकेतून इतिहासाच्या पुस्तकांचा आग्रह दिसतो.

याचवेळी फक्त ग्रंथ प्रकाशन करून भागणार नाही तर ग्रंथांचे व्यावसायिक पद्धतीने वितरण झाल्याशिवाय ग्रंथ व्यवहार फलदायी होणार नाही अशी महाराजांची भूमिका होती. यासंदर्भात

याच चर्चेत पुढे महाराज म्हणतात, "मि. यंदे, पाश्चिमात्य देशांतील लोकशिक्षणाच्या मानाने आपला देश फारच मागे आहे. शिक्षणप्रसार व ग्रंथप्रसार या करिता मी सतत प्रयत्न चालविला आहे, परंतु सहकारित्वावाचून असलीं कामे यशस्वी होत नाहीत. आपण चालविलेला प्रयत्न फार चांगला आहे, तो नेटाने चालू द्या. आपल्या राज्यांत पुष्कळ सुशिक्षित मंडळी आहे त्यास उद्योगास लावा आणि आम्ही छापलेल्या ग्रंथांचा प्रसार सर्वत्र होईल असे करा." सयाजीरावांची वरील भूमिका समाज 'ज्ञानमार्गी' व्हावा यासाठीची महाराजांची तळमळ व्यक्त करते. याचवेळी त्यांना या कामासाठी १,२०० रुपये देणगी दिली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ५० लाखांच्या पुढे जाईल. आधुनिक काळात समाजाला ज्ञानी करण्यासाठी महाराष्ट्रातच काय देशातही एवढी गुंतवणूक केल्याचे एकही उदाहरण सापडणार नाही. यंदेंसारख्या कर्तबगार व्यक्तीला पाठबळ देऊन मराठी ग्रंथ निर्मितीच्या क्षेत्रात महाराजांनी जो अभूतपूर्व प्रयोग केला तो आधुनिक भारताच्या इतिहासातील अपवाद ठरावा.

## ग्रंथ संपादक मंडळीचा रौप्यमहोत्सव आणि सयाजीराव

१९३० मध्ये जानेवारी महिन्यात ग्रंथ संपादक मंडळीला ३५ वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त १० जानेवारीला सयाजीरावांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे ३५ वर्षांचा ज्युबिली समारंभ कार्यक्रम झाला. महाराजांची तब्येत ठीक नसतानाही यंदे आणि साहित्य यावरील प्रेमापोटी महाराज कार्यक्रमाला उपस्थित राहिले. उभा राहून पाऊण तास व बसून अर्धा तास असे सव्वा तास महाराजांनी

भाषण केले. १९०४ मध्ये सयाजीराव महाराजांचा पुणे येथील गायकवाड वाडा लोकमान्यांना मिळवून देण्यात यंद्यांची भूमिका महत्त्वाची होती. राजद्रोहाच्या खटल्यात यंदेंनी टिळकांना आर्थिक मदत केली. इतकेच नव्हे तर राजद्रोहाच्या खटल्यात आरोपींना कोर्टात त्यांची बाजू मांडत असताना ती छापील स्वरूपात मांडण्याचे बंधन होते. पण प्रिंटिंग प्रेसने राजद्रोहाच्या आरोपाचे कोणतेही साहित्य छापू नये असा नियमही केला होता. अशा परस्थितीत यंदेंनी त्यांच्या प्रेसमध्ये खटल्यासंदर्भातील मजकूर छापून देण्याची हिम्मत दाखवली. या उदाहरणावरून त्यांचे सयाजीरावांशी असणारे विश्वासाचे नाते जसे अधोरेखित होते तसेच समकालीन चळवळींमध्ये यंदेंचा असणारा सहभाग सुद्धा अधोरेखित होतो. सयाजीरावांनी त्यांना राजरत्न पदवीने गौरवले होते.

## मराठी साहित्य संमेलन आणि यंदे

महाराजा सयाजीरावांनी यंदेंच्या प्रकाशन व्यवसायाबरोबर मराठी ग्रंथ निर्मितीला दिलेले पाठबळ याबाबत १९३४ च्या बडोदा येथील मराठी साहित्य संमेलनातील प्रकाशन विभागाच्या चर्चासत्राचे अध्यक्ष म्हणून व्यक्त केलेल्या भावना याबाबत पुरेशा बोलक्या आहेत. यंदे म्हणतात, '...फार लांब कशाला ? ज्या वटोदरपुरींत आपण मराठी साहित्याची चर्चा करण्याकरिता आज एकत्र झालो आहोत, त्या या बडोदे शहरात पन्नास वर्षांपूर्वीची लोकस्थिती, समाजस्थिती, आरोग्यस्थिती कशी होती, किती शाळा होत्या, किती लोक शिक्षणाचा लाभ

घेत होते, किती वाङ्मय तयार होत होते आणि आज त्याच शहरात आरोग्य, शिक्षण व वाङ्मय याचे क्षेत्र किती वाढले आहे, याचा आपण विचार केल्यास आज सर्वच बाबतींत कल्पनातीत प्रगती झाली आहे, असेच आपणास दिसून येईल.

पन्नास वर्षांपूर्वी या बडोदे शहरांत हातात काठी घेतल्यावाचून व नाकाला पदर लावल्यावाचून रस्त्याने चालणे मुष्किलीचे होते. मुलाची शाळा लोकसंख्येच्या मानाने हजारास १ सुद्धा नव्हती व मुलीच्या शाळांची तर वानवाच होती. स्वतंत्र मुद्रणालये, नियतकालिके व वर्तमानपत्रे औषधालाही नव्हती परंतु आज तेच बडोदे शहर इंद्राच्या अमरावतीप्रमाणे भासत आहे. पूर्वीचे खाचाखळग्यांनी व दोहो बाजूच्या घाणपाण्याने भरलेले रस्ते नाहीसे होऊन त्या ठिकाणी विद्युत् प्रकाशाने प्रकाशित झालेले, दोहोंबाजूंच्या विविध वृक्षछायेने आच्छादिलेले, खडी-डांबराने तुळतुळीत केलेले भव्य रस्ते दिसत आहेत.

पूर्वींचीं मोडकी घरे, रस्त्यांत इतस्ततः वावरणारी कुत्रीं व गाढवे जाऊन त्याच ठिकाणीं दोहोबाजूस उभारलेली माडीची निवासगृहे, जागोजाग विश्रांतीकरिता सज्ज असलेलीं उपवने व ज्ञानार्जनार्थ उभारलेली शारदामंदिरे आणि सकाळ संध्याकाळ विद्यार्जनार्थ जाणाऱ्या व परतणाऱ्या मुलांमुलीचे गंगौघाप्रमाणे वाहणारे प्रवाह पाहिले म्हणजे आज आपण इंद्रपुरींत आहोत की काय, असे वाटल्यास त्यात आश्चर्य कसले! साहित्यक्षेत्रातही बडोदे शहराने अपूर्व प्रगती केली आहे. ज्या बडोदे राज्यात पूर्वी एकही मुद्रणालय किंवा वर्तमानपत्र नव्हते, तेथे आज दशकानी

मोजता येतील इतके छापखाने व नियतकालिके साहित्यसेवा करीत आहेत. ग्रंथलेखन व ग्रंथप्रकाशन हा काय प्रकार आहे, हे स्वप्नातही जेथे येत नव्हते, त्या ठिकाणी साहित्य क्षितिजावर नक्षत्रासारखे अनेक लेखक चमकू लागले आहेत.

राष्ट्रकथामाला, विविधग्रंथमाला, ज्ञानमंजूषा, साहित्यमाला, बालज्ञानमाला, क्रीडामाला, इ. इ. मालाच्या द्वारा वाङ्मयभाण्डारात अनेक ग्रंथाची भर पडून रा. सा. गोविंदराव सरदेसाई, श्री. दाजी नागेश आपटे, प्रो. चिंतामणराव जोशी, जनरल नानासाहेब शिंदे, प्रो. माणिकराव, श्री. वाकसकर, श्री. वा. वी. जोशी, कवी चंद्रशेखर, गोरे, श्री. वी. पा. दांडेकर, श्री. आनंदीबाई जयवंत, श्री कृष्णाबाई इ. इ कर्तृत्ववान विद्वद्रत्ने वाङ्मयाच्या क्षितिजावर चमकू लागली आहेत.

सारांश, गेल्या ५० वर्षांचा इतिहास पाहिला म्हणजे कालचक्राच्या परिस्थितीनुरूप विविध बाबतीत आम्ही आघाडी मारली आहे असेच दिसून येईल साहित्यक्षेत्रात मराठी भाषेने जी आघाडी मारली आहे, त्याचे पुष्कळसे श्रेय तत्कालिन कार्यकर्ते व साहित्यभक्त कै. न्या. मू. रानडे, श्री. जगन्नाथ शंकरशेठ, भाण्डारकर, तेलंग, माडगावकर, पंडित, परब, शं. मो. रानडे, ह. ना. आपटे, गुंजीकर, टिळक, आगरकर, कुंटे, गोळे, भानु, महाजनी, देशमुख, चिपळूणकर, त्रिलोकेकर, कीर्तिकर, कानिटकर, तुकारामतात्या, जोतीराव फुले, राजारामशास्त्री भागवत, वामन दाजी ओक, रा. सा. विनायक कोंडदेव ओक यांच्यासारख्या अनेक पुरोगामी कर्तृत्ववान् विद्वानांनी पुढाकार घेऊन केलेल्या

साहित्यसेवेस आणि श्रीमंत सयाजीराव महाराजांसारख्या कर्तृत्ववान राज्यकर्त्या पुरुषानी वेळोवेळी दिलेल्या प्रोत्साहनास द्यावे लागते.'

१९३२ व १९३४ अशा दोन मराठी साहित्य संमेलनांच्या प्रकाशन विभागाच्या परिसंवादाचे अध्यक्षपद यंदेंना या कर्तबगारीमुळेच दिले गेले. १९११ मध्ये बाबासाहेबांना शिष्यवृत्तीसाठी केळूसकर गुरुजी यंदेंमार्फतच सयाजीरावांकडे घेऊन गेले हा इतिहास आपण जाणतोच याबाबतीतही महाराष्ट्राने सयाजीरावांबरोबरच केळूसकर आणि यंदे यांचे सदैव ऋणी राहिले पाहिजे.

पुढे १९३५-३६ मध्ये यंद्यांनी ज्ञानप्रसाराच्या उद्देशाने 'ज्ञानमंदिर' नावाचे मासिकही चालविले. मुंबईच्या सार्वजनिक जीवनात त्यांचा सक्रिय भाग होता. 'मराठा ऐक्येच्छू सभे'चे ते एक प्रमुख कार्यकर्ते होते. प्रकाशन व्यवसायाचा एक भाग म्हणून भागभांडवल गोळा करून लिमिटेड कंपनी चालविण्याच्या प्रयोगात यंद्यांना मोठे नुकसान झाले. आयुष्याचा अखेरचा काल फारसा समाधानकारक गेला नाही. ते पुण्याला स्थायिक झाले व पुणे वास्तव्यातच त्यांचा २८ नोव्हेंबर १९४४ अंत झाला. मराठी पत्रकारिता, मुद्रण आणि प्रकाशन या क्षेत्रांत दामोदर सावळाराम यंदे यांनी बजावलेली कामगिरी चिरस्मरणीय ठरेल यात शंका नाही.

●●●

## सयाजी ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पूरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

# महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Specchess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# सयाजी ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळयात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी सयाजी ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही सयाजी ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
सयाजी ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com